**<u>रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. ५८/२००९ मधील नि. ५ वरील आदेश</u>**

प्रस्तूत अर्ज वादीने आदेश ३९ नियम १ दिवाणी प्रक्रिया संहिते नुसार तात्पुरत्या मनाई हुकुमा करिता दाखल केला आहे.

०२. थोडक्यात हकीकत अशी की,

मौजे घोट तालुका पाटण जि. सातारा येथील शेत मिळकती ज्या दावा कलम १ मध्ये वर्णनीत केल्या आहेत, या मिळकती दाव्याच्या विषयी असुन यापुढे 'वाद मिळकती' म्हणून संबोधल्या जातील. वादींच्या म्हणण्यानुसार वाद मिळकती मुळच्या गणू शिंदे याच्या मालकीच्या होत्या. गणूस गोविंदा, गोपाळ व सिताराम अशी अपत्ये होती, गोविंदा फार वर्षापूर्वी मयत झाला आहे त्याची पत्नी अतीत येथील होती गोविंदा सासू सास—या सोबत रहात होता, त्याने त्याचा असलेला वाद मिळकतीतील अधिकार वादीचे पूर्व हक्कदार यांना बहाल केला. गणूचे तिसरे अपत्य सिताराम अविवाहित मेले त्यामुळे वादीचे पूर्व हक्कदार यांनाच संपूर्ण शेतीमध्ये कायदेशीर अधिकार मिळाला व ते एकमेव एकटेच वहिवाट करू लागले. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतीवादींचे पुर्व हक्कदार विष्णू याचे नाव महसूल दप्तरी पुढे तसेच चालू होते, तो अतित येथे रहात असल्यामुळे दावा मिळकतीत त्याने कधीही वहीवाट केली नाही, प्रतीवादीचा देखील जन्म, लग्न सर्व अतित येथे झाले त्यामुळे त्यांनी देखील कधीही वहीवाट केली नाही. विष्णू याने स्वत: अर्ज देवून दि. २९/०१/१९९५ रोजी वादी क्र. २ चे नाव वाद मिळकतींना लावून दिले त्यावरून फेरफार नंबर ६२३ झाला, त्यानंतर वादी क्र. २ ने वादी क्र. १ व ३ यांचे नाव वाद मिळकतींना प्रत्येकी ८ आणे हिश्याने लावून दिले त्याविरूध्द प्रतीवादींनी कधीही तक्रार केली नाही. परंतु दि. ११/१२/२००७ रोजी तहसिलदार यांचेकडे खोटी तक्रार दाखल करून फेरफारा विरूध्द तक्रारी केल्या व जमिनी पवणचक्कीला विकण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यावरून वादींच्या वाद मिळकतीवरील वहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत म्हणून जोपर्यंत त्यांना कायदेशीर मार्गाने कब्जा मिळत नाही तोपर्यंत वाद मिळकती मधील वादीच्या वहीवाटीस हरकत अडथळा करू नये असा कायम मनाई हूकुम मिळण्या करीता दावा दाखल करून प्रस्तुत अर्ज तात्पुरत्या मनाई हुकुमाकरीता दाखल केला.

०३. प्रतीवादी क्र. १ याने नि. क्र. ४३ वर कैफियत दाखल करून दाव्यास विरोध केला आहे व दावा मिळकती प्रतिवादींच्या वडीलार्जीत मिळकती आहेत, वादी प्रतीवादी भावकीतील आहे, त्यांचा जवळचा संबंध नाही, ते वाद मिळकतीची

देखभाल जावून येवून करतात, प्रतिवादींचा विश्वास घात करून वादींनी तलाठी, मंडल अधिकारी यांच्याशी संगणमत करून कुठल्याही पुराव्याविना नोंदी अस्तित्वात आणल्या, त्यांच्या घरास देखील स्वत:चे नाव लावून घेतले म्हणून त्यांनी वादी विरूध्द या न्यायालयात रे.दि.मु.नं. ११०/०९ दाखल केला आहे. या फेरफाराविरूध्द तहसिलदार पाटण यांनी आदेश करून दोन्ही फेरफार रदद् केले व दावा मिळकत हडप करणेकरीता खोटा दावा केला म्हणून फेटाळून लावावा अशी विनंती केली.

०४. खालील मुददे प्रस्तुत केले व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादींनी प्रथम दर्शनी केस सिध्द केली काय ? | ........ होय |
| २. वादींच्या लाभात न्यायाचा तौलीक तराजू आहे काय? | .........होय |
| ३. अर्ज फेटाळल्यास वादींचे कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे काय? | ........होय |
| ४. काय आदेश ? | ........ अर्ज मंजुर करणेत येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

०५. वादींनी त्यांचे प्रथमदर्शीनी म्हणणे सिध्द करणेकरीता मिळकतींचे ७/१२ उतारे, फेरफार नंबर ६२३ व ३२०, तहसिलदार पाटण यांचेकडून आलेली नोटीस तसेच साक्षीदार वसंत शिंदे मुक्ताबाई शिंदे, विनायक शिंदे, अनिल काटे, जालिंदर शिंदे, सुरेश शिंदे, विनायक शिंदे व अरविंद शिंदे यांची शपथपत्रे दाखल केली आहेत. तर प्रतिवादींनी तहसिलदार पाटण यांनी दिलेला आदेश दि. २३/०१/२०१० चा दाखल केला आहे. वादी प्रतिवादी यांच्या वकीलांनी तोंडी युक्तीवाद केला.

**<u>मुद्दा क. १ बाबत :–</u>**

०६. वाद मिळकतींच्या ७/१२ उता—यांचे अवलोकन केल्यानंतर असे निदर्शनास येते की, दावा दाखल तारखेस वाद मिळकतीच्या ७/१२ उता—यामध्ये वादी क्र. १ व वादी क्र. ३ यांची नावे मालक व कब्जेदार म्हणून दर्शविलेली आहेत. फेरफार क्र. ३२० चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादींचे पुर्व हक्कदार विष्णू गोविंद शिंदे यांनी दि. २५/०१/१९९५ रोजी अर्ज दिल्यावरून व ते दत्तक गेल्यामुळे वाद मिळकतींच्या महसूल दप्तरी प्रतिवादी क्र. २ हिचे नाव भावजय म्हणून प्रत्यक्ष वहीवाटीवरून दाखल करणेची विनंती केली होती, त्यावरून हा फेरफार नोंदविण्या आला. त्यानंतर वादी क्र. २ हीने अर्ज देवून फेरफार नं. ६२३ प्रमाणे वादी क्र. १ व ३ यांचे नाव वाद मिळकतीला ८—८ आणे हिश्याने नोंदविलेले आहे. हे खरे आहे की, हे दोन्हीही फेरफार प्रतिवादींनी तहसिलदार पाटण यांच्याकडे अर्ज देवून रदद् करून घेतले तसा आदेश दि. २३/०१/२०१० रोजी पारीत केलेला आहे, या निकालाची प्रत प्रतिवादींनी दाखल केलेली आहे. प्रतिवादी या मिळकतींचे मालक आहेत किंवा नाहीत हा मुदद्ा पुराव्या अंती निकालात निघणार आहे परंतु याक्षणी वाद मिळकतीवर कोणाची वहिवाट आहे हे पाहणे गरजेचे आहे. वादी मिळकतींचे मालक आहेत किंवा नाहीत हा देखील मुदद्ा पुराव्या अंतीच निकालात निघणार आहे त्यामुळे प्रस्तुत अर्ज विचारात घेणेकरीता वाद मिळकतीवर वादींची वहिवाट आहे का? हे पाहणे गरजेचे आहे. वादींच्या वकीलांनी तोंडी युक्तीवादात १९९५ साला पासून वादींची वहिवाट आहे, त्यांचे नाव वाद मिळकतींना मालक व कब्जेदार म्हणून नोंदविली आहेत, प्रतिवादींचे पुर्व हक्कदार दत्तक गेल्याने १९९५ साली वादींची नोंद झाली होती, प्रतिवादी वादींच्या वहिवाटीस हरकत करत आहेत म्हणून अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली. तर प्रतिवादींच्या वकीलांनी दत्तक गेल्याचा पुरावा नाही, नोंदी रदद् झाल्या आहेत त्याविरूध्द वादींनी कुठलेही अपील केलेले नाही, वादींना कायदेशीर मालकी नाही, वहिवाट नाही, प्रतिवादी बाहेर गावी राहतात याचा गैरफायदा घेवून महसूल अधिका—यांशी संगतमत करून नोंदी केल्या होत्या, जर मनाई हुकूम दिला तर प्रतिवादींना हुसकावून लावतील, नोंदी वरून कुठलाही अधिकार प्राप्त होत नाही म्हणून अर्ज फेटाळण्याची मागणी केली.

०७. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद व समोर आलेला कागदोपत्री पुरावा याचा विचार केल्यावर असे निदर्शनास येते की, ज्या फेरफारानुसार वादींच्या नोंदी झाल्या होत्या ते फेरफार रदद् झालेले आहेत, या तहसिलदार पाटण यांच्या आदेशा विरूध्द

वादींनी अदयाप अपील केल्याचे त्यांच्या दाव्यामध्ये किंवा पुराव्यात कोठेही दर्शविलेले नाही. वरील परिच्छेदमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे वाद मिळकतींचे खरे मालक कोण हा मुददा पुराव्या अंती निकालात निघणार आहे परंतु या क्षणी वाद मिळकतीवर वादींची वहिवाट असल्याचे या ७/१२ उता—यामधून प्रथमदर्शनी दिसून येते. हे खरे आहे की, केवळ फेरफार वरुन कुठल्याही व्यक्तिस अधिकार प्राप्त होत नाही परंतु हा मुद्दा या क्षणी विचारात घेण्याची आवश्यकता नाही, १९९५ साला पासुन वादींची वहिवाट असल्याचा ७/१२ उतारा त्यांनी दाखल केलेला आहे, त्यांची प्रत्यक्ष वहिवाट असल्याचे पाहुनच त्यांच्या नोंदी झालेल्या आहेत, तहसिलदार पाटण यांच्या आदेशामध्ये देखिल त्यांनी वादींची जरी वहिवाटी असली तरी मालकी हक्क शाबीत करणारी कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत असे निष्कर्ष काढुन फेरफार नं. ३२० व ६२३ रद्द केलेले आहेत. प्रतिवादींच्या वकिलांनी देखिल प्रतिवादी बाहेर गावी राहतात हे कबुल केले आहे, वादींनी देखिल प्रतिवादी बाहेर गावी राहतात त्यांनी वाद मिळकतीवर कधी वहिवाट केली नाही असे कथन केलेले आहे. या सर्व कागपत्रांवरुन प्रथमदर्शनी वादींची वहिवाट वाद मिळकतींवर आहे हे दिसुन येते. या व्यतिरीक्त वादींनी अनेक लगतच्या साक्षीदारांची शपथपत्रे दाखल करुन मिळकतींवर वादींची वहिवाट असल्याचे शपथेवर कथन केलेले आहे, तर प्रतिवादींची नावे मालक व कब्जेदार म्हणुन वाद मिळकतीला या तहसिलदार पाटण यांच्या आदेशा वरुन नोंदविल्याचा कुठलाही पुरावा प्रतिवादींनी दाखल केलेला नाही. वादींनी त्यांच्या वहिवाटी बाबत प्रथमदर्शनी ठोस असा पुरावा दाखल केलेला आहे त्यामुळे जोपर्यंत प्रतिवादी कायदेशीररीत्या मिळकतीचा ताबा वादीकडुन घेत नाहीत तोपर्यंत त्यांना बेकायदेशीरपणे वादींच्या वहिवाटीस हस्तक्षेप, हरकत करता येत नाही. प्रतिवादींनी देखिल या न्यायालयात याच मिळकती संबंधी दिवाणी दावा दाखल केलेला आहे त्यामुळे कमीत कमी या प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादींना वादींच्या वहिवाटीस हरकत अडथळा करता येणार नाही म्हणुन मुद्दा क्र. १ होकारार्थी उत्तरीत करत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ व ३ बाबत :—</u>**

०८. मुद्दा क्र. १ वरील होकारार्थी निष्कर्षामुळे वादींच्या लाभात न्यायाचा तौलिक तराजू आहे. जर मनाई हुकूम दिला नाही तर प्रतिवादी त्यांच्या वहिवाटीस हरकत अडथळा करतील, त्यांना बेदखल करतील त्यामुळे त्यांचे कधीही न भरुन येणारे

नुकसान होणार आहे म्हणून मुद्दा क्र. २ व ३ होकारार्थी उत्तरीत करुन खालील आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करणेत येतो.

२. प्रतिवादी किंवा त्यांच्या वतीने कोणीही वादींच्या वाद मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस कोणत्याही प्रकारे कायदेशीररीत्या त्यांना ताबा मिळेपर्यंत किंवा दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्यात येतो.

३. खर्चाचा आदेश दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी करणेत येईल.

ठिकाण : पाटण (किरण रं. देशपांडे)
दिनांक : ०५/०९/२०१३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पाटण